**प्रेस नोट** **दि.२७/०३/२०१९**

## शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर

## म.न.पा बस स्टँड येथे सापडलेला बॉक्स सुरक्षीतपणे ताब्यात दिलेबाबत.

दिनांक २६/०३/२०१९ रोजी नियंत्रण कक्ष पुणे शहर येथुन पुणे मनपा बस स्टँड येथे एक बेवारस बॉक्स असलेबाबत माहिती कळविल्याने सदर ठिकाणी आम्ही स्वतः,श्री.बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पो.स्टे तसेच शिवाजीनगर मार्शलचे कर्मचारी असे तात्काळ रवाना होवुन सदर ठिकाणी बी.डी.डी.एस यांना पाचारण केले.बॉक्सची तपासणी चालु असताना शिवाजीनगर बीट मार्शलचे कर्मचारी यांनी संबंधीत बॉक्स मालकांचा शोध घेतला असता इसम नामे धनंजय भोडवे वय २८ वर्षे रा. वारजे पुणे यास बॉक्स पडलेल्या ठिकाणी घेवुन आले व त्याने सदरचा बॉक्स हा आमचे कंपनीचा असुन त्यामध्ये किचन ट्रॉलीचे मटेरीयल आहे.मी बस बदलताना सदरचा बॉक्स हा विसरुन राहिल्याचे सांगीतल्याने त्याबाबत खात्री करुन तो धनंजय भोडवे यांचे ताब्यात देण्यात आलेला आहे.

सध्या लोकसभा निवडणुक २०१९ चे अनुषंगाने आचार संहिता लागु असुन पुणे शहरामध्ये यापुर्वी झालेले बॉम्ब स्फोट,व्हीव्हीआयपी यांचे दौरे या अनुषंगाने तात्काळ नियंत्रण कक्ष येथुन प्राप्त झालेल्या कॉलप्रमाणे बी.डी.डी.एस पुणे शहर यांचेसह मनपा बस स्टँड येथे दाखल होवुन मिळुन आलेल्या बॉक्स बाबत खात्री करुन संबंधीतांचे ताब्यात दिलेला आहे.

वरील नमुद कामगीरी हि बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोउनि दर्शन शिंदे,पो शि ठाकरे,पोना शेवरे यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर